2 5 NOV 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'नवोन्मेष' हा विद्यापीठ समाजाशी जोडण्याचा उपक्रम

## कुलगुरू डॉ. शिर्के ; विद्यापीठात 'इनोव्हेशन मीट' कार्यक्रम

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

'नवोन्मेष' उपक्रमाला प्रोत्साहन हा विद्यापीठाला समाजाशी अधिक दृढपणे जोडण्याचा महत्त्वाचा प्रयत्न आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

महाराष्ट्र राज्य नवोन्मेष संस्था, शिवाजी विद्यापीठ संशोधन व विकास फाऊंडेशन (सेक्शन-८ कंपनी) व विद्यापीठाचे इनोव्हेशन, इनक्युबेशन व लिंकेजिस केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'इनोव्हेशन मीट'च्या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.



कोल्हापूर : 'नवोन्मेष' परिषदेत बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. पी. डी. राऊत, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. एम. एस. देशमुख.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, तळागाळातील खेडोपाड्यातील सर्वसामान्य नागरिक, छोटे उद्योजक, व्यावसायिक आणि विद्यार्थी यांच्याकडे अनुभवातून किंवा कल्पनेमधील अनेक नवसंकल्पना असतात. सुप्त नवसंकल्पनांना मंच प्रदान करण्याच्या हेतूने विद्यापीठाने नवोन्मेषाला प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले आहे. अशा नवोन्मेषाला मंचावरच उपयुक्त पर्यावरण, सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील आहे.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी मनोगतात प्राचीन काळापासून नवोन्मेष संशोधनाने मानवी जीवन कसे सुकर व सुखकर केल्याची उदाहरणे दिली. प्रास्ताविक इनोव्हेशन केंद्राचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले. पर्यावरण अधिविभागाच्या प्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी सूत्रसंचालन केले. ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ डॉ. पी. डी. राऊत यांनी आभार मानले.

इनोव्हेशन मीटसाठी समाजाच्या विविध घटकांकडून ऑनलाईन व ऑफलाईन स्वरुपात १३८ नवोन्मेष संकल्पनांचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. या प्रस्तावांचे व्यवस्थापन, मॅकेनिकल व ऊर्जा, माहिती तंत्रज्ञान व संगणक, अन्न व प्रक्रिया, कृषी, पर्यावरण व पर्यटन आणि आरोग्य अशा सहा विभागांमध्ये वर्गीकरण करण्यात आले.

पुण्यनगरी

# घाळी महाविद्यालयाच्या १५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

येथील डॉ. घाळी महाविद्यालयातील १५ विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठाची गुणवत्ता शिष्यवृत्ती मिळाली. सन २०२०-२१ मध्ये शिवाजी विद्यापीठाची १५ विद्यार्थ्यांना जवळपास एक लाखाहून अधिक रुपयांची विशेष गुणवत्ता शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. यामध्ये सानिका लाड, प्रेरणा वाजंत्री, बशीरा मुलाणी, भावेश शिंदे, आशा साळुंखे, रवींद्र नांगनूरकर, सुजाता कुरणे, सुप्रिया पाटील, स्नेहल इंदूलकर, आज्ञा कोळेकर, अर्चना कुराडे, स्वाती माने, प्राची कातकर, अश्विनी पाटोळे, ओंकार गुरव हे विद्यार्थी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीचे मानकरी ठरले आहेत. प्रत्येकी दहा हजार व पाच हजार शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे.

2 5 NOV 2021
तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कविवर्य रेंदाळकर वाचनालयास सर्वतोपरी सहकार्य

- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे आश्वासन
- विविध साहित्यिक पुरस्कारांचे वितरण

वार्ताहर
हुपरी

राज्यातील अनेक विद्यापीठांच्यावतीने उत्कृष्ट मानला जाणारा पुरस्कार हा रेंदाळ येथील कविवर्य एकनाथ रेंदाळकर वाचनालयाचा आहे. भविष्यकाळाचा विचार करून तरुण पिढीला वाचनाची सवय लागली पाहिजे याकरिता एक समिती स्थापन करून त्यांच्या माध्यमातून वाचनालयाच्या नावाची वेबसाईट तयार करून देशभर प्रसिद्ध करावे. रेंदाळकरांचे योगदान मोठे असून त्या ठिकाणी साहित्यिकांचे केंद्रस्थान निर्माण करावे, याकरिता सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिले.



हुपरी : कवीवर्य एकनाथ रेंदाळकर वाचनालयाच्यावतीने पुरस्कार वितरणप्रसंगी बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, समवेत प्राचार्य डॉ. सुनीलकुमार लवटे, सांगलीचे उपजिल्हाधिकारी गणेश मडकर, लेखक सूरज रफिक, आर. एम. पाटील, विलास बडवे, सदाशिव पाटील आदी.

रेंदाळ (ता. हातकणंगले) येथील कविवर्य एकनाथ पांडुरंग रेंदाळकर वाचनालयाच्यावतीने उल्लेखनीय साहित्य, कविता संग्रह, कादंबरी, कथा संग्रह, बालवाङ्मय यात उत्कृष्ट योगदानाबद्दल विविध पुरस्कारप्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ लेखक, प्राचार्य डॉ. सुनीलकुमार लवटे होते. सांगलीचे उपजिल्हाधिकारी गणेश मडकर, लेखक सूरज रफिक, आर. एम. पाटील, विलास बडवे, सदाशिव पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, रेंदाळ वाचनालय केवळ चार ते पाच विद्यापीठांना माहीत आहे. लेखक, नाटककार जयसिंग पाटील यांनी उचललेला वाचनालयाचा विडा सर्व तरुण पिढीच्या मनात रुजून वाचनालयाचे महत्त्व वाढावेत याकरिता केंद्रीय स्थान होणे गरजेचे आहे.

डॉ. सुनीलकुमार लवटे म्हणाले, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू जागृत आहेत. ते स्वतः साहित्य, लेखक, कांदबरीकार नसूनही त्यांना वाचनाचे वेड आहे. रेंदाळकर वाचनालय हा गोड पाण्याचा झरा आहे. नव्या पिढीला सुंदरमय ज्ञानाचे माळ फुलविण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले. त्यानंतर सुरज रफिक यांनी पाहुण्यांची ओळख व मानपत्राचे वाचन केले.

उल्लेखनीय साहित्य योगदानाबद्दल २०१९ मधील साहित्य पुरस्कार जयसिंग पाटील, मेघा पानसरे व २०२० मधील साहित्य पुरस्कार विजय चोरमारे, आशुतोष पोतदार यांना मिळाला आहे. कविता संग्रह– पद्मरेखा धनकर (चंद्रपूर), राजू देसले (नाशिक), कादंबरी– महेंद्र कदम (टेंभुर्णी), संतोष जगताप (सांगोला), बालवाङ्मय – आबा गोविंदा महाजन (जळगांव), एकनाथ आव्हाड (मुंबई), कथा संग्रह – सुचिता घोरपडे (कोल्हापूर) यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.

स्वागत सुरेश पाटील यांनी केले. प्रास्ताविक अध्यक्ष आर. एम. पाटील यांनी केले. सूत्रसंचालन नाईक, रयाजी पाटील यांनी केले. यावेळी वाचनालयाचे उपाध्यक्ष विलास बडवे, सदाशिव पाटील, आण्णा हरी कोळी, रघुनाथ पाटील, दत्तात्रय पाटील, बाबुराव दांडगे, भास्कर अलाटकर सलगरे ,उपस्थित होते. आभार शिवाजीराव सादळे यांनी मानले.

तरुण भारत

# 'नवोन्मेष'द्वारे विद्यापीठ समाजाशी जोडणार

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन


प्रतिनिधी
कोल्हापूर

सर्वसामान्यांच्या मनातील नवोन्मेष उपक्रमाला प्रोत्साहन हा विद्यापीठाला समाजाशी अधिक दृढपणे जोडण्याचा महत्त्वाचा प्रयत्न आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी काढले.

राज्य नवोन्मेष संस्था, शिवाजी विद्यापीठ संशोधन, विकास फौंडेशन (सेक्शन-८ कंपनी), इनोव्हेशन, इनक्युबेशन, लिंकेजिस केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'इनोव्हेशन मीट'चे आयोजन केले होते. तंत्रज्ञान सभागृहात या बैठकीचे उद्घाटन कुलगुरू शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यार्थ्यांच्या मनात अभ्यास, संशोधनाद्वारे अनेक कल्पना मूळ धरतात. त्यांना मूर्त रुप देण्यासाठी सहाय्य, मार्गदर्शन व सहकार्याची आवश्यकता असते. अशा सुप्त नवसंकल्पनांना व्यासपीठ उपलब्ध करण्यासाठी विद्यापीठाने नवोन्मेष उपक्रमाला प्रोत्साहनाचे धोरण स्वीकारले आहे. उपाय शोधणे म्हणजेच नवोन्मेषाची संधी असते, असे त्यांनी सांगितले.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, संशोधकांकडे मूलभूत संकल्पना,



सक्षमता, संयम असणे आवश्यक असते. नवनिर्मितीपासून शाश्वत विकासाकडे वाटचाल करावयाची आहे, याचे भान संशोधकांकडे असावे, असे सांगितले.

इनोव्हेशन केंद्राचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख यांनी स्वागत केले. पर्यावरण अधिविभाग प्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी सूत्रसंचालन केले. ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ डॉ. पी. डी. राऊत यांनी आभार मानले.

**नवोन्मेष संकल्पनांचे १३८ प्रस्ताव**

नवोन्मेष संकल्पनांचे १३८ प्रस्ताव प्राप्त झाले. या प्रस्तावांचे व्यवस्थापन, मॅकेनिकल व ऊर्जा, माहिती तंत्रज्ञान व संगणक, अन्न व प्रक्रिया, कृषी, पर्यावरण व पर्यटन आणि आरोग्य अशा सहा विभागांमध्ये वर्गीकरण करण्यात येऊन दिवसभरात २७ विषय तज्ज्ञांसमोर त्यांचे गटनिहाय सादरीकरण केले.

25 NOV 2021

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# छत्रपती शिवाजी महाराज पुतळा संवर्धनासाठी समिती

## शिल्पकार, वस्तुसंग्रहालय, इतिहासकार यांच्याकडून पाहणी



कोल्हापूर : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आश्वरूढ पुतळा आणि चौथऱ्याची पाहणी करताना ॲड. धैर्यशील पाटील, डॉ. अवनिश पाटील, उदय सुर्वे, महेश डोंगरसाने.

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराज यांचा आश्वरूढ पुतळा दीर्घ काळ टिकावा यासाठी विद्यापीठाने पुतळा संवर्धन समिती गठीत केली आहे. या समितीचे अध्यक्ष व्यवस्थापन परिषद सदस्य ॲड. धैर्यशील पाटील आहेत. त्यांच्या अध्यक्षतेखाली पहिली बैठक पार पडली, या बैठकीत वस्तुसंग्रहालय, शिल्पकार, इतिहासकार यांचे मार्गदर्शन घेण्याचा निर्णय झाला. या समितीच्या सदस्यांनी पुतळयाची पाहणी केली.

छत्रपती शिवाज महाराज यांच्या आश्वरूढ पुतळा संवर्धनासाठी उपाययोजना करण्याचे विद्यापीठ

- **ॲड. धैर्यशील पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना**
- **शिल्पकार डोंगरसाने विद्यापीठाला सादर करणार अहवाल**

प्रशासनाने ठरवले आहे. विद्यापीठातील पुतळा मेटल ब्राऊंज धातूपासून बनवला आहे. पुतळा परिसर सुशोभीकरणासह पुतळा संवर्धनही केले जाणार आहे. पुतळ्याच्या चौथऱ्यालाही कलर देता येईल का यासंदर्भात विचार केला जाईल. कोल्हापुरातील शिल्पकार महेश डोंगरसाने हे पुतळयाची पाहणी करून विद्यापीठाला अहवाल सादर करणार आहेत.

सादर केलेल्या अहवालानंतर पुढील निर्णय घेतला जाईल. व्यवस्थापन सदस्य ॲड. धैर्यशील पाटील यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या पुतळा संवर्धन समितीमध्ये भारतीय पुरातत्व विभागाचे जतन सहाय्यक, महाराष्ट्र शासनाचे वस्तुसंग्रहालय प्रमुख उदय सुर्वे, कोल्हापुरातील शिल्पकार महेश डोंगरसाने, चित्रकार धीरज जे. सुतार, अभियांत्रिकी विभागाचे माजी उपकुलसचिव गिरीश कुलकर्णी, अभियांत्रिकी उपकुलसचिव रणजीत यादव, तंत्रशिक्षण विभागाचे प्रो. अजित कोळेकर या सदस्यांचा समावेश आहे.

तरुण भारत

# निसर्गोपचार काळाची गरज

## तज्ज्ञ डॉ. गोविंद जयस्वाल यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

निसर्गोपचारातून मानवी शरीरासाठी निसर्गातील उपयुक्त घटक हवा, पाणी, अग्नी, प्रकाश आदी पंचमहाभूताचा योग्य वापर केल्यास आपण निरोगी राहतो. त्यामुळे निसर्गोपचार ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन निसर्गोपचार तज्ज्ञ डॉ. गोविंद जायस्वाल यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन, विस्तार विभागात आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. सुमन बुवा होत्या.

जायस्वाल म्हणाले, निसर्गोपचाराचा योग्य वापर केल्यास माणूस आरोग्य चांगले करू शकतो. आधुनिकीकरणाच्या माध्यमातून त्याचे दुष्परिणाम मानवी जीवनावर दिसून येतात. यासाठी महात्मा गांधीजींच्या तत्वांचे आचरण केले तर दैनंदिन जीवनात शरीर स्वास्थ्य चांगले लाभेल. डॉ. बुवा म्हणाल्या, निसर्गोपचार ही स्वास्थ जपण्यासाठी अतिशय महत्वाची चिकित्सा आहे. त्यातून स्वास्थ टिकवायचे असेल तर निसर्गोपचाराचा वापर दैनंदिन जीवनात करणे गरजेचे आहे. डॉ. श्वेतलीना पाटील यांनी सूत्रसंचालन केले. अरविंद पालके यांनी आभार मानले. यासाठी प्रभारी संचालक डॉ. ए. एम. गुरव यांचे मार्गदर्शन लाभले.